# हापूस



## मराठी शिक्षक पुस्तिका

# 4

**संकल्पना**
अनुज गुप्ता

**लेखिका**
मिनाक्षी आनंदा पवार

**संपादक**
विद्या रायकर

Harbour Press
INTERNATIONAL

# अनुक्रमाणिका


| | | |
|---|---|---|
| १. | प्रार्थना (देवा तुझे किती...) | ३ |
| २. | लोभ | ४ |
| ३. | संत एकनाथ | ५ |
| ४. | या बाळांनो या रे या! | ६ |
| ५. | चित्रकथा: श्रावणबाळ | ८ |
| ६. | मदतीचा हात | ८ |
| ७. | भाज्यांचे अनोखे भांडण | ९ |
| ८. | या दुनियेचे रक्षक | १० |
| ९. | सर्वश्रेष्ठ कोण? | ११ |
| १०. | शिदोरी-चांगल्या सवयींची | १३ |
| ११. | डराव-डराव! | १४ |
| १२. | जनसेवा हीच ईश्वरसेवा | १६ |
| १३. | झाडाची साक्ष | १७ |
| १४. | मजा आठवते सुट्टीची | १८ |
| १५. | बाळ गंगाधर टिळक | १९ |

# १ प्रार्थना ( देवा तुझे किती... )

## ✦ काव्य परिचय

- प्रार्थनेतून विद्यार्थ्यांना निसर्गाची निर्मिती होण्यामागे शास्त्रीय कारणे असूनही त्याच्या पाठीमागे एक दैवी शक्ती असते अशी श्रद्धा आहे ह्या विषयी चर्चा करणे.
- देवाचे आकाश खूप सुंदर आहे. सूर्याचा प्रकाशही सुंदर आहे.
- आकाशातील चंद्र, चांदण्या खूप सुंदर आहेत आणि त्याचे चांदणे सुंदर पसरते.
- पाखरे, झाडे सुंदर असून ते गोड गाणी गातात.
- सुंदर वेली, त्यांची फुले सुंदर आहेत. देवा, तशी आम्ही तुझी मुले आहोत.
- तुझे जग इतके सुंदर आहे तर देवा, तू किती सुंदर असशील?
- अशा सर्व गोष्टीतून निसर्गाच्या या घटकांचा आदर करावा, सांभाळ करावा ही शिकवण देणे.

## ✦ उद्देश

- प्रार्थना म्हणजे काय? प्रार्थनेचे प्रत्येकाच्या मनातील स्थान समजावून सांगणे.
- प्रार्थनेतून सृष्टीच्या विधात्याचे म्हणजेच देवाचे आभार मानणे.
- प्रार्थनेचा मूळभाव विद्यार्थ्यांना समजावणे.
- विद्यार्थ्यांमध्ये मराठी भाषेविषयी रुची वाढविणे.

## ✦ अध्यापन कृती

विद्यार्थ्यांना काही प्रश्न विचारावेत.

- नैसर्गिक घटक कोणकोणते आहेत?
- निसर्गाचा सांभाळ कसा कराल?
- निसर्गाचा सांभाळ करण्याबाबत आपले कर्तव्य सांगा.

आपण आज देव व त्यांनी निर्माण केलेली ही सृष्टी याविषयी एक प्रार्थना शिकणार आहोत. ज्या प्रार्थनेत देव व त्याने बनवलेल्या सृष्टीचे कौतुक केलेले आहे.

## ✦ सामूहिक कार्य

- विद्यार्थ्यांना **देवा तुझे किती.....** ही प्रार्थना पाठांतरासाठी देणे.
- विद्यार्थ्यांचा १०-१० चा गट करून प्रार्थना म्हणण्यास सांगणे.
- प्रत्येक विद्यार्थी आपल्या गटात प्रार्थना म्हणतील.

## ✦ उत्तरे

**प्र १.** १. सूर्य प्रकाश देतो.

२. पाखरे गोड गाणी गातात.

३. मुले वेलीवरच्या सुंदर फुलांसारखी आहेत.

४. चंद्राचे चांदणे पडते.

**प्र २.** १. सुंदर चांदण्या, <u>चंद्र हा सुंदर</u>

<u>चांदणे सुंदर</u> पडे त्याचे।।

२. सुंदर वेलींची, <u>सुंदर ही फुले</u>
<u>तशी आम्ही मुले</u> देवा तुझी।।

३. सुंदर ही झाडे, <u>सुंदर पाखरे</u>
<u>किती गोड बरे</u> गाणे गाती।।

**प्र ३.** १. रवी  २. पुष्प  ३. शशी  ४. गीत

**प्र ४.** १. कुरूप  २. दानव  ३. कडू

**प्र ५.** १. अनेकवचन  २. एकवचन
३. अनेकवचन  ४. एकवचन

**प्र ६.** दिलेल्या शब्दांच्या साहाय्याने विद्यार्थी त्यांच्या बौद्धिक क्षमतेनुसार चित्र काढून रंग भरतील.

**प्र ७.** १. रेडकू  २. पाडस  ३. पिल्लू  ४. वासरू
५. कोकरू  ६. बछडा  ७. शिंगरू  ८. करडू
९. छावा

## २ लोभ

### ✦ पाठ परिचय

- स्वामी नावाचा तरुण ज्याचे पाचशे रुपये हरवणे.
- हरवलेले पाकीट ज्यात पाचशे रुपये आहेत जो ते पाकीट आणून देईल त्याला शंभर रुपयांचे बक्षीस दिले जाईल असे स्वामीचे म्हणणे.
- एक सभ्य गृहस्थाने पाकीट आणून देणे.
- पाकीट देणाऱ्याला शंभर रुपये बक्षीस द्यावे असे स्वामीच्या वडिलांचे म्हणणे.
- स्वामीचा गृहस्थावर शंभर रुपये चोरले असा आरोप करणे.
- गृहस्थाला चोरीचा आरोप केल्यामुळे राग येणे.
- खटला न्यायालयात जाणे.
- न्यायाधीशांच्या प्रश्नात स्वामी अडकणे व पाचशे रुपये गमावणे.

### ✦ उद्देश

- विद्यार्थ्यांना गोष्टीरूपाने लोभ करू नये ही शिकवण देणे.
- विद्यार्थ्यांमध्ये मराठी विषयाची आवड निर्माण करणे.

### ✦ अध्यापन कृती

- विद्यार्थ्यांना लोभ करू नये या विषयावर आधारित एखादी गोष्ट सांगावी.
- वर्गात एखाद्याची वस्तू हरवली आहे किंवा कोणीतरी घेतली आहे हे तुम्हाला माहीत आहे असे प्रसंग घडल्यास तुम्ही काय कराल? यावर चर्चा करून विद्यार्थ्यांना त्यांचे अनुभव सांगण्यास प्रवृत्त करणे.

**उदाहरण–**सोन्याची अंडी देणारी कोंबडी, लोभी कुत्रा यासारख्या गोष्टी सांगून विद्यार्थ्यांकडून लोभ करू नये हे तात्पर्य काढावे तसेच लोभ केल्याने काय नुकसान होते हे विद्यार्थ्यांना समजावणे.

- शिक्षकांनी पाठ शिकविण्यापूर्वी पाठातील कथा गोष्टीरूपाने सांगावी.
- विद्यार्थ्यांकडून पाठाचा अर्थ विचारत पाठ समजावून सांगावा.

✦ **उत्तरे**

**प्र १.** १. तरुण मुलाचे नाव 'स्वामी' होते.
२. स्वामीचे ज्यात ५०० रुपये होते ते पाकीट हरवले होते.
३. पाकीट शोधून देणाऱ्यास शंभर रुपयांचे बक्षीस जाहीर केले.
४. न्यायाधीशांनी विचरल्यावर तरुणाने पाकिटात पाचशे रुपये होते असे सांगितले.
५. या पाठात सद्गृहस्थ प्रामाणिक आहे.

**प्र २.** १. विश्वास २. अतिलोभापायी ३. नुकसान ४. राग ५. निर्णय

**प्र ३.** १. निकाल २. आरोप ३. युवक ४. क्रोध

**प्र ४.** १. अन्याय २. अनेक ३. वृद्ध ४. अविश्वास

**प्र ५.** १. चूक २. चूक ३. बरोबर ४. बरोबर

✦ **हसत-खेळत**

**प्र ६.** विद्यार्थी आपल्या मित्र-मैत्रिणींची नावे स्वत: लिहितील.

**प्र ७.** विद्यार्थी स्वत:च्या बौद्धिक क्षमतेनुसार उत्तरे लिहितील.

## ३ संत एकनाथ

✦ **पाठ परिचय**

- संत एकनाथांचा परिचय.
- एकनाथांचे शिष्यासह कावड घेऊन काशीला जाणे.
- उन्हाळ्याचे दिवस, दुपारचे कडक ऊन असणे, त्या रखरखीत वाळवंटात एक गाढव तहानेने व्याकूळ होऊन तडफडणे.
- गाढवाला तहान लागली आहे हे महाराजांना समजणे व महाराजांनी कावडमधील गंगाजल त्या गाढवाला पाजणे.
- गाढवाला तरतरीत वाटणे व ते उठून उभे राहणे.
- महाराजांनी गाढवाच्या पाठीवरून प्रेमाने हात फिरवणे.
- आपल्याला गाढवाचा विटाळ झाला, गंगाजल अपवित्र झाले असे शिष्यांचे म्हणणे.
- मुक्या प्राण्याला तडफडत मरू दिले तर रामेश्वराला जाऊन आपली यात्रा कशी पूर्ण होईल? असे एकनाथांचे म्हणणे होते.
- एकनाथांचे उच्च विचार.

✦ **उद्देश**

- विद्यार्थ्यांना संताविषयीची माहिती मिळणे.
- विद्यार्थ्यांना गोष्टीरूपाने प्राणीमात्रांवर दया करावी ही शिकवण देणे.

✦ **अध्यापन कृती**

- शिक्षकांनी प्रथम विद्यार्थ्यांना असलेल्या पूर्वज्ञानातून संत एकनाथ किंवा महाराष्ट्रातील

संतांविषयीची माहिती जाणून घ्यावी. संतांची नावे ज्ञात असल्यास विचारावीत.

- पाठ शिकवण्यापूर्वी शिक्षकांनी संत एकनाथांविषयी माहिती सांगावी.
- पाठात असलेला एकनाथांच्या जीवनातील प्रसंग शिक्षकांनी गोष्टीरूपाने सांगावा. नंतर पाठ शिकवताना पाठाचा अर्थ विद्यार्थ्यांकडून विचारत पाठ समजावणे.
- पाठाखालील प्रश्नांवर चर्चा करावी.

✦ **उत्तरे**

**प्र १.** १. संत एकनाथ महाराज यात्रेला काशीहून गंगेची कावड घेऊन रामेश्वरला जात होते.

२. गोदावरी नदीच्या काठी 'पैठण' हे एक गाव आहे.

३. कडक उन्हात पाणी पाजून महाराजांनी रखरखीत वाळवंटात तडफडणाऱ्या गाढवाची तहान भागवली.

४. संत एकनाथ महाराजांचा शिष्य 'उद्‌धव' होता.

५. गाढवाचं तडफडणं पाहून महाराजांनी रामेश्वराला अभिषेक करण्यासाठी आणलेले कावडीतील गंगेचे पाणी त्या गाढवाला प्यायला दिले.

**प्र २.** १. चूक २. बरोबर ३. चूक ४. बरोबर

**प्र ३.** १. दु:ख २. वर ३. घाबरट/घाबरा

४. रागीट ५. मागे

**प्र ४.** १. खेडे २. दिन ३. ईश्वर

४. नीर ५. करुणा

**प्र ५.** १. गावे २. लेकरू ३. संत

**प्र ६.** १. महाराणी २. देवी ३. पक्षिणी

✦ **हसत-खेळत**

**प्र ७.** १. संत तुकाराम २. संत ज्ञानेश्वर

३. संत नामदेव ४. संत चोखामेळा

५. संत कबीर ६. संत मदर तेरेसा

७. संत रामदास ८. संत बहिणाबाई

## ४ या बाळांनो या रे या!

✦ **काव्य परिचय**

- कवयित्रीचे मुलांना पावसात भिजण्यासाठी, मजा करण्यासाठी लवकर या असे सांगणे; नाहीतर पाऊस आपल्याला फसवेल, दडी मारून पळेल हे सांगणे.
- पाऊस वेळेवर कधी येत नसल्यामुळे सारेजण त्याची वाट बघून थकतात; पण आता तो सगळ्यांना तृप्त करायला आला आहे असे सांगणे.
- वृक्षतोड केल्याने पाऊस रागावून बसला आहे. त्यामुळे पावसाचा राग घालवण्यासाठी आम्ही एकेक वृक्ष लावू असे मुलांचे पावसाला वचन देणे; पण तू वेळेवर ये अशी पावसाला विनवणी करणे. मुलांना मात्र भविष्याचे नियोजन करण्याचे महत्त्व सांगणे.

✦ **उद्‌देश**

- विद्यार्थ्यांना पावसाची मजा समजावणे.
- पावसाची रीत समजावणे.
- पावसाचे अवेळी येणे, तसेच दडी मारून नंतर पळणे यामागचे कारण समजावणे.
- भविष्यातील पाणी वाचवणे, झाडे न तोडणे यासारखे काही नियोजन करण्याबाबत सल्ला देणे.

✦ **अध्यापन कृती**

- शिक्षकांनी पावसातील एखादी कविता म्हणून दाखवावी.
- पावसातील मजा, पावसाचे अचानक येणे, त्यामुळे उडणारी धांदल तसेच पावसाचे अचानक जाणे, तेंव्हा वातावरणात होणारे बदल या सर्वांवर विद्यार्थ्यांना प्रश्न विचारावेत. त्यांचे अनुभव जाणून घेणे.
- कवितेतील कठीण शब्दांचा अर्थ विद्यार्थ्यांकडून विचारत कविता शिकवावी.
- पावसातील मजा, पाऊस येण्याच्या निरनिराळ्या पद्धती, वृक्षतोडीमुळे होणारे परिणाम व त्यामुळे आपण काय नियोजन करायला पाहिजे? याविषयी चर्चा करून विद्यार्थ्यांचे मत जाणून घेणे.
- या चर्चेनंतर विद्यार्थ्यांकडून पुस्तकातील कविता म्हणवून घेणे.
- कवितेवर आधारित प्रश्नांवर चर्चा करणे.

✦ **सामूहिक कार्य**

- विद्यार्थ्यांना कविता पाठांतरासाठी देणे.
- विद्यार्थ्यांचे गट करून कविता म्हणण्यास सांगणे.

✦ **उत्तरे**

**प्र १.** १. **या बाळांनो या रे या** कवितेतील मुले पावसाचे स्वागत करीत आहेत.
२. लहान-थोर आणि सृष्टी पावसाची वाट बघून थकले आहेत.
३. मानवाने वृक्षतोड केली; म्हणून पावसाच्या मनात रुसवा आहे.
४. वेळेवर पाऊस येण्यासाठी आपण वृक्ष लावली पाहिजेत.
५. वृक्ष लावून आपण भविष्याचे नियोजन केले पाहिजे.

**प्र २.** १. पाऊस आला आज रे
<u>मजा करूया चला रे</u>
<u>नाही तर तो फसवेल रे</u>
<u>दडी मारून </u>पळेल रे

२. मानवाने वृक्ष तोड केली रे
<u>मनी तो रुसवा आहे का रे</u>
<u>एक-एक वृक्ष आम्ही लावू रे</u>
<u>पण तू वेळेवर</u> येशील का रे

**प्र ३.** १. पद्धत  २. झाड
३. वर्षा  ४. मौज

**प्र ४.** १. मोठे  २. अतृप्त  ३. अनेक

प्र ५. १. लवकर  २. मजा  ३. रुसवा
४. बाळांनो  ५. वृक्ष

## ५ चित्रकथा: श्रावणबाळ

✦ **चित्रकथा परिचय**

- चित्रे व त्यावर आधारित प्रश्न-उत्तरातून विद्यार्थ्यांना चित्रवर्णन ह्या विषयांची ओळख करून देणे.
- श्रावणबाळ या कथेची ओळख.

✦ **उद्देश**

- विद्यार्थ्यांना चित्रकथेतील चित्रे पाहून कोणाच्याही मदतीशिवाय उत्तरे देता येणे.
- विद्यार्थ्यांना मराठी शब्द व वाक्ये यांचा सराव होणे.
- विद्यार्थ्यांना मराठी विषयाची आवड निर्माण होणे.
- विद्यार्थ्यांना छोटे-छोटे प्रश्न विचारून मराठीत उत्तरे देण्यास प्रोत्साहित करणे.

✦ **अध्यापन कृती**

- विद्यार्थ्यांना प्रथम पुस्तकातील चित्रांचे निरीक्षण करण्यास सांगावे.
- चित्रांतील व्यक्तिरेखांची ओळख करून द्यावी.
- चित्रांतील व्यक्ती काय संभाषण करत असतील हे विद्यार्थ्यांना समजावून द्यावे.
- अशाप्रकारे श्रावणबाळाची संपूर्ण गोष्ट विद्यार्थ्यांना सांगावी.

## ६ मदतीचा हात

✦ **पाठ परिचय**

- सदाशिव नावाचा एक गरीब, स्वाभिमानी शेतकरी. जो आपली पत्नी व मुलांसह झोपडीत राहणे.
- त्यांची परिस्थिती खूप बेताची असणे.
- त्याची पत्नी आजारी पडणे, आजार बरा न होणे व त्यामुळे दवाखान्यात नेण्यासाठी आवश्यक पैसे नसणे.
- शामचे वडील सरकारी नोकरीत असणे. त्यामुळे त्यांची परिस्थिती चांगली असणे. गणू व शाम चांगले मित्र असणे.
- शामला गणूच्या घरची परिस्थिती समजणे, शामने वडिलांना गणूच्या घरची हकिकत सांगणे.
- सदाशिव काका सहजासहजी पैसे घेणारे नाहीत हे माहीत असल्यामुळे शाम व त्याच्या वडिलांनी एक युक्ती करणे.
- शामने व त्याच्या वडिलांनी काही रक्कम शेतातील जमिनीत लपवून ठेवणे.
- सदाशिव काकांना पैसे मिळणे व त्यांनी मनोमन आभार मानणे.

✦ **उद्देश**

- विद्यार्थ्यांनी एकमेकांना मदत करावी ही शिकवण देणे.
- गोष्टींमार्फत मराठी विषयाची आवड निर्माण करणे.

✦ **अध्यापन कृती**

- शिक्षकांनी विद्यार्थ्यांना पाठातील कथा ही गोष्टीरूपाने सांगावी.
- नंतर पाठ शिकविताना पाठात येणारे कठीण शब्दांचे अर्थ उदाहरणातून समजावत पाठाचा अर्थ सांगावा.
- छोट्या प्रश्नांमधून पाठाची पुनरावृत्ती करावी.
- पाठाखालील प्रश्नांवर चर्चा करावी.
- पाठाचे आवाजाच्या चढ-उतारासह प्रकट वाचन करून घेणे.

✦ **उत्तरे**

**प्र १.** १. सदाशिव स्वाभिमानी शेतकरी होता.
२. सदाशिव गरीब होता.
३. गणूच्या मित्राचे नाव शाम होते.
४. शामचे वडील सरकारी नोकरीत काम करत होते.

**प्र २.** १. झोपडीपाशी २. हकिकत ३. अश्रू

**प्र ३.** १. सदाशिव २. शामचे वडील
३. सदाशिवची पत्नी/गणूची आई ४. शाम

**प्र ४.** १. दीन २. माता ३. गृह
४. हर्ष ५. शिवार ६. नयन

**प्र ५.** १. शत्रू २. श्रीमंत ३. वाईट

**प्र ६.** १. आई २. मैत्रीण ३. शेतकरीण
४. देवी

✦ **हसत-खेळत**

**प्र ७.** शिक्षकांनी विद्यार्थ्यांना स्वत:चे अनुभव सांगण्यास प्रोत्साहन द्यावे.

## ७ भाज्यांचे अनोखे भांडण

✦ **पाठ परिचय**
- चित्रे व वाक्ये यांची सांगड घालत कथालेखन याविषयाची ओळख.

✦ **उद्देश**
- चित्रे व वाक्ये यांची सांगड घालत गोष्ट तयार करता येणे.
- विद्यार्थ्यांना मराठी विषयाची आवड निर्माण करणे.

✦ **अध्यापन कृती**
- शिक्षकांनी पाठातील चित्रांच्या नावाबद्दल विद्यार्थ्यांशी चर्चा करावी.
- पाठातील वाक्ये वाचता-वाचता त्यामध्ये चित्रांची नावे म्हणत वाक्ये पूर्ण करण्यास सांगावी.
- संपूर्ण गोष्ट परत म्हणवून घ्यावी.
- पाठाखालील कठीण शब्दांचे अर्थ तसेच पाठाखालील प्रश्नांची उत्तरे यावर चर्चा करावी.
- पाठाचे आवाजाच्या चढ-उतारासह प्रकट वाचन करून घेणे.

✦ **उत्तरे**

**प्र १.** १. शेतकरी झाडाखाली झोपलेला होता.

२. बटाटा आणि टोमॅटो जोरजोरात बोलत होते.

३. गाजर व काकडी लहान-मोठे सर्वजण कच्चेच खातात.

४. भाज्यांचे बोलणे शेतकरी शांतपणे ऐकत होता.

**प्र २.** १. पावभाजीत  २. हलवा  ३. शेतकऱ्याच्या

४. उपयोगी  ५. आराम

**प्र ३.** १. शेतकरी  २. फुलकोबी  ३. वडापाव

४. गाजर  ५. झाडाखाली

**प्र ४.** १. टोमॅटो  २. भज्या  ३. झाडे

४. काकड्या  ५. पराठे

**प्र ५.** विद्यार्थी सुंदर अक्षरात पाठ्यपुस्तकातील शब्द परत लिहितील.

**प्र ६.** १. सगळ्यांचा  २. माझ्यापासून  ३. तेवढ्यात

४. मोठ्यांपर्यंत  ५. प्रत्येकाचे  ६. इतक्यात

**प्र ७.** १. वाटाणा  २. काकडी  ३. गाजर

४. घर  ५. संत्री

**प्र ८.** १. बटाटे  २. टोमॅटो  ३. गाजर

## ८ या दुनियेचे रक्षक

✦ **काव्य परिचय**

- कवयित्री मुलांना सांगत आहे की तुम्ही या देशाचे रक्षक आहात. तुम्ही पुढे चालत राहिले पाहिजे.
- कोणाची पर्वा न करता, न घाबरता सर्वांनी भारतभूच्या प्रगतीसाठी प्रयत्न केले पाहिजे.
- जर कोणी माणूस या भारतभूमीला त्रास देत असेल तर त्याला रोखले पाहिजे. प्रत्येक माणसातील गुणांना, माणुसकीला जपले पाहिजे.
- आपण हिंमतीने व शुद्ध मनाने, ज्ञानाने अंधार दूर केला पाहिजे व आपला देश सर्व बाजूने उजळून नेला पाहिजे.
- प्रत्येक दिवसाची सुरुवात ही नवीन विचारांची असली पाहिजे. ज्याच्यात कोठेही विज्ञानाचा दुरुपयोग नसला पाहिजे. उज्ज्वल भविष्य व शांतीचा ठसा मनात उमटला पाहिजे.

✦ **उद्देश**

- कवितेमार्फत देशाबद्दल अभिमानाची भावना निर्माण करणे.
- विद्यार्थ्यांना कवितेमार्फत मराठी विषयाची आवड निर्माण करणे.
- पाठांतराची सवय लावणे.

✦ **अध्यापन कृती**

- शिक्षकांनी विद्यार्थ्यांना देशभक्तीची गाणी ऐकवून विद्यार्थ्यांच्या देशाबद्दल असलेल्या भावना जाणून घेणे.
  किंवा
- **या दुनियेचे रक्षक** ही कविता शिकविताना कवितेतील कठीण शब्दांचा अर्थ विद्यार्थ्यांना विचारून घ्यावा.

- प्रत्येक ओळीचा अर्थ व त्यामागील आशय समजावताना सोप्या भाषेचा वापर करावा की जेणेकरून विद्यार्थ्यांना कवितेचा अर्थ व त्यामागील उद्देश सहजरीत्या समजेल.
- कवितेची पुनरावृत्ती करावी व कवितेखालील प्रश्नांवर चर्चा करावी.
- प्रथम शिक्षकांनी कवितेला चाल लावून देणे व त्यानंतर विद्यार्थ्यांना सामूहिक गायन करण्यास सांगणे.

✦ **उत्तरे**

**प्र १. अ.** १. **या दुनियेचे रक्षक** या कवितेत कवयित्री मुलांना प्रेरणा (प्रोत्साहन) देत आहे की तुम्ही या दुनियेचे रक्षक आहात, सेवक आहात तर चांगले काम करताना कुणाची पर्वा करू नका. तसेच दयेचा व प्रेमाचा हात दाखवून भारतभूच्या प्रगतीचा वसा घ्या व पुढे-पुढे चालत रहा.

२. कवियत्री **या दुनियेचे रक्षक** या कवितेत मुलांना जागृत करून सांगत आहे की प्रत्येक दिवस नवीन विचारांनी जगा; परंतु विज्ञानाचा दुरुपयोग करू नका. भविष्य उज्ज्वल करण्यासाठी मनात शांतीचा ठसा उमटू द्या.

**ब.** १. या कवितेत 'चला, पुढे पुढे चला' असे लहान मुलांना म्हटले आहे.

२. माणसातला राक्षस नष्ट करण्यासाठी मानवतेला व माणुसकीला जपायचे आहे.

३. सामर्थ्याने व शुद्ध मनाने अंधार दूर होईल.

४. विद्यार्थ्यांनी/मुलांनी विज्ञानाचा दुरुपयोग न करता उज्ज्वल भविष्य व शांती आणावी.

**प्र २. १.** करू न कुणाची पर्वा
दयेचा, प्रेमाचा हात द्या सर्वा
भारतभूच्या प्रगतीचा घ्या तुम्ही वसा।

२. प्रत्येक दिन हा नवा असू दे
विज्ञानाचा दुरुपयोग नसू दे
उज्ज्वल भविष्य आणि शांतीचा मनी उमटू दे ठसा।

| | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| **प्र ३.** | १. | नोकर | २. | बळ | ३. | बाजू | ४. | दिवस | ५. | मनुष्य |
| **प्र ४.** | १. | मागे | २. | देव | ३. | अशुद्ध | ४. | जुना | ५. | उजेड |
| **प्र ५.** | १. | सेवक | २. | हात | ३. | दिशा | ४. | माणसे/माणसं | | |

✦ **हसत-खेळत**

**प्र ६.** शिक्षकांनी विद्यार्थ्यांना स्वत:च्या बौद्धिक क्षमतेनुसार प्रश्नाचे तोंडी उत्तर वर्गात देण्यास सांगावे.

## ९ सर्वश्रेष्ठ कोण?

✦ **पाठ परिचय**

- आनंदवन अरण्यात अनेक प्राणी, पक्षी राहत असे. त्यात राजू नावाचा कावळा व वेणू नावाचे कबूतर असे.
- दोघेही एकमेकांचे चांगले मित्र असणे.
- दोघांमध्ये श्रेष्ठ कोण? यावरून भांडण सुरू होणे.
- दोघांनी स्पर्धा घेण्याचे ठरवणे, जो जिंकेल तो श्रेष्ठ असे ठरणे.

- दोघांनी समान वजन पाठीवर घेऊन उडायचे व सर्वात उंच उडेल तो स्पर्धा जिंकेल असे ठरणे.
- कावळ्याने आपल्या पाठीवर मीठ व कबूतराने आपल्या पाठीवर कापूस एका पिशवीत बांधून आकाशात उडणे.
- दोघांचेही एकत्र आकाशात उडणे.
- कबूतराचे कावळ्याने मीठ घेतलेले पाहून तिरस्काराने हसणे.
- थोड्यावेळात पाऊस पडणे.
- कापूस पावसात भिजल्याने कबूतराच्या पाठीवरील वजन वाढणे तर मीठ पाण्यात विरघळल्याने पाठीवरचे ओझे कमी होणे.
- कावळ्याचे आकाशात उंच उडणे.
- पाठामागील तात्पर्य समजावणे.

✦ **उद्‌देश**

- विद्‌यार्थ्यांना कोणालाही कमी लेखू नये ही शिकवण देणे.
- प्रत्येकाच्या अंगी काहीना काही विशेष गुण असतातच त्यामुळे विद्‌यार्थ्यांना स्वत:च्या अंगी असलेले गुण ओळखण्यासाठी प्रवृत्त करणे.
- गोष्टीमार्फत मराठी विषयाची आवड निर्माण करणे.

✦ **अध्यापन कृती**

- शिक्षकांनी विद्‌यार्थ्यांना ससा व कासव यांच्यासारखी प्राण्यांमध्ये लागणाऱ्या शर्यतीची कथा सांगावी.
- गोष्टीतून कोणता बोध होतो ते विचारावे.
- कोणालाही कमी लेखू नये अशाप्रकारे प्रत्येकाच्या अंगी काहीना काही असा विशेष गुण असतोच. त्यामुळे प्रत्येकाने स्वत:ला कमी समजू नये ही शिकवण देताना शिक्षकांनी पाठातील गोष्टीच्या प्रसंगावर आधारित चित्रांची कार्डे बनवून विद्‌यार्थ्यांना गोष्ट सांगावी.
- गोष्ट शिकविताना गोष्टीत येणारे कठीण शब्दांचे अर्थ उदाहरणातून समजवावेत. गोष्ट चांगल्याप्रमाणे समजल्यावर पाठ शिकविताना शक्यतो विद्‌यार्थी पाठाचा अर्थ सांगतील याकडे कटाक्ष ठेवावा.
- छोट्या-छोट्या प्रश्नातून पाठाची पुनरावृत्ती करावी.
- पाठाखालील प्रश्नांवर चर्चा करावी.

✦ **उत्तरे**

**प्र १.** १. राजू नावाचा कावळा व वेणू नावाचा कबूतर या दोन पक्ष्यांमध्ये भांडण झाले; कारण त्यांच्यात 'सर्वश्रेष्ठ कोण?' अशी स्पर्धा लागली होती.

२. स्पर्धेत राजू व वेणू यांनी समान वजनाचे काहीही आपल्या पाठीवर घेऊन आकाशात उडायचे. जो सर्वात उंच उडेल तो स्पर्धा जिंकेल. अशाप्रकारे स्पर्धा घेण्याचे ठरवले.

३. कावळ्याने स्पर्धेत आपल्या पाठीवर मिठाचे ओझे घेतले. पावसामुळे मीठ वितळले. अशाप्रकारे कावळ्याने युक्तीने काम केले; म्हणून तो स्पर्धा जिंकला.

**प्र २.** १. आनंदवन अरण्यात अनेक प्रकारचे प्राणी व पक्षी राहत होते.

२. शक्तीपेक्षा नेहमी युक्ती श्रेष्ठ असते.

३. काही वेळा प्रसंगी शक्तीपेक्षा युक्तीने कार्य सफल होते.

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| **प्र ३.** | १. | मीठ | २. | मित्र | ३. | स्पर्धा | | |
| | ४. | कबूतर | ५. | सफल | | | | |
| **प्र ४.** | १. | दाट, गर्द | २. | जंगल | ३. | गगन | | |
| | ४. | चुरस/चढाओढ | ५. | कपास | ६. | महान | | |
| | ७. | बळ | ८. | वर्षा | | | | |
| **प्र ५.** | १. | शत्रू | २. | सखोल | ३. | कनिष्ठ | | |
| | ४. | जास्त | ५. | असमान | | | | |
| **प्र ६.** | १. | कावळे | २. | पिशवी | ३. | अरण्ये | ४. | गोष्ट |
| **प्र ७.** | १. | कावळा | २. | कबूतर | ३. | कबूतर | ४. | कावळा |

✦ **हसत-खेळत**

**प्र ८.** विद्यार्थी आपल्या आवडत्या पक्षाचे चित्र चिकटवून आपल्या बौद्धिक क्षमतेनुसार लेखन करतील.

## १० शिदोरी-चांगल्या सवयींची

✦ **पाठ परिचय**

- चांगल्या सवयींची ओळख.

✦ **उद्देश**

- विद्यार्थ्यांना चित्रातील कृतीमार्फत चांगल्या व वाईट सवयींची ओळख करून देणे.
- विद्यार्थ्यांच्या वाईट वर्तनावर आळा घालण्याचा प्रयत्न करणे.
- विद्यार्थ्यांमध्ये घराप्रमाणेच समाजाबद्दल आपलेपणा तसेच प्रेम, जिव्हाळा निर्माण करणे.

✦ **अध्यापन कृती**

- शिक्षकांनी विद्यार्थ्यांना काही कृतीमार्फत चांगली वागणूक व वाईट वागणूक कोणती हे समजवावे.

  **उदाहरण**

  शिक्षकांनी पाच-पाच विद्यार्थ्यांचे गट करावेत. एका गटाला चांगल्या कृती व एका गटाला वाईट कृतींची उदाहरणे देऊन त्यावर कृती करण्यास सांगावी. इतर विद्यार्थ्यांना कोणती कृती केली आहे व ती कृती योग्य आहे की अयोग्य हे ओळखण्यास सांगावे.
- पाठातील कृती स्वत: विद्यार्थ्यांना करण्यास सांगावी.

✦ **उत्तरे**

**चित्र १**

नळाखाली बादली भरून वाहताना

उत्तर- नळ बंद कराल.

**चित्र २**

केळी खाल्यानंतर साल रस्त्यावर फेकलेले.

उत्तर- साल कचराकुंडीत टाकाल.

**चित्र ३**

बागेत मुले फुले तोडताना.

उत्तर- बागेत जाऊन खेळाल, फुले तोडणार नाही.

**चित्र ४**

घरात पुस्तके, खेळण्यांचा पसारा व टि. व्ही. चालू.

उत्तर- प्रथम आपल्या वस्तू जागेवर ठेवाल, मग टि.व्ही. बघाल.

**चित्र ५**

शाळेबाहेर उघड्यावरच्या वस्तू खाताना मुले.

उत्तर- स्वच्छ व आईने बनवलेलेच अन्न खाल.

**चित्र ६**

खिडकीतून वस्तू किंवा कचरा फेकताना.

उत्तर- त्या व्यक्तीस त्याची चूक निदर्शनास आणून द्याल.

**शब्दकोडे**

**चित्र १**

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | फ |
| | | | का | व | ळा |
| अ | न | न | स | | |
| ज | ळ | | व | | |
| ग | | | | | |
| र | | | | | |

**चित्र २**

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | फु | | |
| | | ल | सू | ण |
| | | दा | | |
| ब | र | णी | | |
| द | | | | |
| क | म | ळ | | |

**चित्र ३**

| | | | |
|---|---|---|---|
| | ह | | |
| | मा | क | ड |
| फू | ल | | म |
| | | | रू |

## ११ डराव-डराव!

✦ **काव्य परिचय**

- **डराव-डराव** करणारा म्हणजेच **बेडूक** या प्राण्याची ओळख करून देणे.
- बेडकांचे घर व गाव याविषयी चर्चा करणे.
- पावसात ते येतात कुठून व कशावरून येतात, त्यांच्या गावाविषयी विचारपूस.
- मुलांना वाटणारी भीती व्यक्त करणे.
- खेळताना पाण्यात त्यांचे दिसणे व बेडकांच्या सवयीबाबत चर्चा.
- मुलांचे बेडकांना पावसाळा संपलाय आता तुम्ही परत जा हे सांगणे.

✦ **उद्देश**

- विद्यार्थ्यांना एका छोट्या प्राण्याची ओळख करून देणे.
- कवितेमार्फत मराठी विषयाची आवड निर्माण करणे.
- पाठांतराची सवय लावणे.

✦ **अध्यापन कृती**

- शिक्षकांनी विद्यार्थ्यांच्या डोळ्यांसमोर पावसाचे वातावरण निर्माण करावे. पावसात निसर्गातील बदल, प्राणी-पक्षी याविषयी चर्चा करावी.
- त्यावेळी **बेडूक** या प्राण्याविषयी चर्चा करावी. बेडकांचा आवाज, त्याचे डोळे, त्याची बसण्याची, उडी मारण्याची पद्धत याविषयी चर्चा करावी. विद्यार्थ्यांना ज्ञात असलेली माहिती व त्यात अधिक भर घालून माहिती सांगावी.
- कठीण शब्दांवर चर्चा करून कवितेचा अर्थ समजाविणे.
- कवितेवर आधारित प्रश्नांची चर्चा करणे.

✦ **सामूहिक कार्य**

- विद्यार्थ्यांना कविता पाठांतरासाठी देणे.
- विद्यार्थ्यांचा १०-१० चा गट करून कविता म्हणण्यास सांगणे.

✦ **उत्तरे**

**प्र १.** १. **डराव डराव!** या कवितेत **'बेडूक'** ह्या प्राण्याचा उल्लेख केलेला आहे.
२. मुलांना रात्री बेडकांच्या ओरडण्याच्या आवाजाची भीती वाटते.
३. पाण्यात खेळतांना मुलांना 'बेडूक' दिसतो.
४. पावसाळा संपला आता परत निघा असे मुले बेडकाला म्हणतात.

**प्र २.** १. आम्हा मुलांना <u>वाटत भ्याव</u>
नका ओरडू <u>रात्री जोरात</u> राव
<u>झोपू द्या आम्हा नका करू</u> डराव-डराव।।

२. पावसाळा थांबला <u>परतीला निघा</u>
सोडा आता <u>आमची खेळायची जागा</u>
<u>परतीच्या प्रवासाला</u> आता तुम्ही निघा।।

**प्र ३.** १. बेडूक २. मुले ३. मुले

**प्र ४.** १. निशा २. निद्रा ३. खेडे
४. वर्षा ५. होडी ६. सफर

**प्र ५.** १. दिवस २. जवळ ३. खोटं

**प्र ६.** १. प्रवास २. डराव ३. गाव ४. जागा

✦ **हसत-खेळत**

**प्र ७.** १. पतंग २. सीताफळ ३. पोपट ४. चांदण्या ५. नदी

**प्र ८.** १. अश्रू २. नदी ३. बर्फ
४. दवबिंदू ५. वाफ ६. पाऊस
७. धबधबा ८. लाटा

## १२ जनसेवा हीच ईश्वरसेवा

✦ **पाठ परिचय**

- गांधीजींच्या कृतीतून अनेकांना त्यांच्या सहवासातून खूप चांगल्या गोष्टी शिकण्यास मिळत असे.
- एका गृहस्थाचे गांधीजींना भेटायला येणे.
- गांधीजींचे त्या गृहस्थाला त्यांना मंदिरात जायचे हे सांगणे.
- मलाही मंदिरात जायचे आहे असे त्या गृहस्थाचे गांधीजींना सांगणे.
- गांधीजींबरोबर त्यांच्या मंदिरात जाण्याचा आग्रह धरणे.
- गांधीजीही त्यांचा आग्रह मान्य करणे व त्यांना आपल्याबरोबर घेऊन जाणे.
- गांधीजींचे एका वृद्धाश्रमात जाणे व वृद्धांची सेवा करणे.
- गांधीजींचे महान विचार व कृती बघून गृहस्थाचे मन भरून येणे.
- गांधीजींच्या कृतीतून त्यांच्या महान विचारांची प्रचीती येणे.

✦ **उद्देश**

- विद्यार्थ्यांना गांधीजींचे विचार व त्यांची वागणूक याविषयी ज्ञान होणे.
- आपल्या देशाचे राष्ट्रपिता यांच्याविषयी विद्यार्थ्यांना ओळख करून देणे.
- गांधीजींनी देशासाठी केलेल्या कार्यातून विद्यार्थ्यांच्या मनात देशाविषयी प्रेम, आपुलकीची भावना जागृत करणे.

✦ **अध्यापन कृती**

- विद्यार्थ्यांशी चर्चा करून त्यांना गांधीजींविषयी असलेली माहिती जाणून घेणे.
- गांधीजींचे विचार व त्यांचा व्यवहार किंवा दैनंदिन आचरण याविषयी चर्चा करावी.
- पाठ समजावताना पाठातील कठीण शब्दांचा अर्थ समजाविणे.
- पाठाखालील प्रश्नांवर चर्चा करावी.

✦ **उत्तरे**

**प्र १.** १. गांधीजींच्या आश्रमातून प्रत्येक मनुष्य काहीना काही प्रेरणा घेऊन जात असे.
२. गांधीजी वृद्धाश्रमात गेल्यानंतर त्या गृहस्थास म्हणाले, "हेच माझे मंदिर आहे आणि जनसेवा हीच माझी ईश्वरसेवा आहे."
३. गांधीजींचे मोलाचे विचार ऐकून सद्गृहस्थाच्या डोळ्यात पाणी आले.

**प्र २.** १. गांधीजी सद्गृहस्थास म्हणाले.
२. गृहस्थ गांधीजींना म्हणाले.
३. गांधीजी गृहस्थास म्हणाले.
४. गृहस्थ गांधीजींना म्हणाले.

**प्र ३.** १. देऊळ २. माफी ३. म्हातारा ४. नवल

**प्र ४.** १. एक २. येऊ ३. बालक ४. दानव ५. अविचार

**प्र ५.** विद्यार्थी शब्द वाचून सुंदर अक्षरात परत लिहितील.

**प्र ६.** १. बरोबर २. चूक ३. बरोबर ४. बरोबर ५. बरोबर

✦ **हसत-खेळत**

प्र ७. विद्यार्थ्यांना गांधीजींचे चित्र चिकटवण्यास सांगून दिलेली माहिती शोधून लिहिण्यास सांगावी. प्रश्नांची अचूक उत्तरे लिहिली आहे की नाही याची शिक्षकांनी पडताळणी करून घ्यावी.

## १३ झाडाची साक्ष

✦ **पाठ परिचय**

- दोन चांगले मित्र असणे.
- एका मित्राला पैशांची गरज असणे व दुसऱ्या मित्राने कोणाचीही साक्ष न ठेवता विश्वासाने पैसे देणे.
- थोड्या दिवसाने कर्ज देणाऱ्या मित्राचे आपल्या मित्राकडे पैसे मागणे तेंव्हा कर्ज घेणाऱ्या मित्राचे पैसे घेतल्याचे नाकारणे.
- खटला बादशहाच्या दरबारात जाणे व बादशहाने बिरबलला न्याय देण्यास सांगणे.
- फिर्यादीने केवळ झाडाखाली व्यवहार झाला हे सांगणे.
- झाड साक्षीदार आहे असे बिरबलाचे सांगणे.
- फिर्यादीने झाडापाशी जाणे तेव्हा आरोपीला तेथेच बसायला सांगणे.
- बिरबलाने विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे देताना आरोपी फसणे.
- फटके मारायची शिक्षा ऐकताच आरोपीने गुन्हा मान्य करणे.
- बिरबलला आरोपीस फिर्यादीला दहा मोहरा जास्त देण्यास सांगणे.

✦ **उद्देश**

- विद्यार्थ्यांना खोटे बोलू नये तसेच कोणाची फसवणूक करू नये अशा गोष्टींची शिकवण देणे.
- गोष्टीतून चांगल्या सवयींची शिकवण विद्यार्थ्यांना देणे.
- नवीन शब्दांची ओळख करून देणे.
- गोष्टीतून मराठी विषयाची आवड निर्माण करणे.

✦ **अध्यापन कृती**

- अकबर-बिरबलाच्या गोष्टींचे विद्यार्थ्यांना ज्ञान असतेच. त्याचा आधार घेत शिक्षकांनी पाठातील गोष्ट विद्यार्थ्यांना सांगावी किंवा पाठातील गोष्ट ही नाट्यरूपाने सादर करावी.
- त्यानंतर पाठ वाचून पाठातील कठीण शब्दांचा अर्थ सांगावा व पाठ समजवावा.
- पाठाखालील प्रश्नांवर चर्चा करावी.

✦ **उत्तरे**

प्र १. १. बिरबलाने आरोपीला दहा मोहरा जास्त देण्याची शिक्षा दिली.

२. गुन्हा कबूल करण्यास झाडाची साक्ष उपयोगी ठरली.

३. धापा टाकत दरबारात फिर्यादी आला.

४. बिरबलाने चाबूक आणण्यास सांगितल्यावर आरोपीने मित्राकडून पैसे घेतल्याचे कबूल केले.

प्र २. १. बिरबल आरोपीस म्हणाला.

२. बिरबल फिर्यादीस म्हणाला.

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| **प्र ३.** | १. | बिरबल | २. | साक्षीदार | ३. | आरोपीला |
| | ४. | फिर्यादी | ५. | हकिकत | | |
| **प्र ४.** | १. | सखा | २. | गुन्हेगार | ३. | तरू |
| | ४. | क्रोध | ५. | नवल | | |
| **प्र ५.** | १. | गैरहजर | २. | अविश्वास | ३. | दुर्लक्ष |
| | ४. | जवळ | ५. | खरे | ६. | शत्रू |
| **प्र ६.** | १. | महाराणी | २. | मैत्रीण | ३. | बाई |

## १४ मजा आठवते सुट्टीची

✦ **काव्य परिचय**

- सुट्टीत मामाच्या गावी केलेली मजा आठवणे.
- गावाला जाताना पळती झाडे, आजीने केलेली रसपोळी, आजीने सांगितलेली गोष्ट यांची आठवण येणे.
- जेवायचाही विसर पडेल इतके खेळले जाणारे खेळ, आईच्या आवाजाने मग घरात पळणे.
- वेगवेगळे खेळ, चिंचा, बोरं यांची आठवण होऊन आता सुट्टी संपलीय हे लक्षात येणे.

✦ **उद्देश**

- विद्यार्थ्यांना आजोळ, गाव, गावातील मजा याविषयी माहिती करून देणे.
- सुट्टीत काय-काय मजा करू शकतो? याची ओळख करून देणे.
- नवीन शब्दांची ओळख करून देणे.
- कवितेतून मराठी विषयाची आवड निर्माण करणे.

✦ **अध्यापन कृती**

- विद्यार्थ्यांना काही प्रश्न विचारून सुट्टीतील गंमत/मजा याविषयीचा त्यांचा अनुभव जाणून घेणे.

**उदाहरण**

१. तुम्ही गावी कधी जाता?
२. तेथे काय-काय मजा करता?
३. तुम्ही उन्हाळ्याच्या सुट्टीत कोठे जाता?

- अशा प्रश्नांच्या उत्तरातून विद्यार्थी सुट्टीत कशी मजा करतात याची कल्पना येईल.
- त्या अनुशंगाने शिक्षकांनी विद्यार्थ्यांना गावातील निसर्ग, त्यातील मजा, खेळ या सर्व गोष्टींची ओळख करून देणे.
- कवितेतील सुट्टीची गंमत, गावातील खेळ, चिंचेची झाडे अशी चित्रे दाखवून विद्यार्थ्यांच्या डोळ्यासमोर गावाकडचे चित्र निर्माण करून कवितेचा अर्थ समजावणे.
- कवितेतील कठीण शब्द, त्यांचे अर्थ व कवितेखालील प्रश्नोत्तरांवर चर्चा करावी.

✦ **सामूहिक कार्य**

- विद्यार्थ्यांना कविता पाठांतरासाठी देणे.
- विद्यार्थ्यांचा १०-१० चा गट करून कविता म्हणण्यास सांगणे.

✦ **उत्तरे**

**प्र १.** १. गावी जाताना पळती झाडे बघण्याची मजा वाटते.

२. मुले खेळताना जेवणाची वेळ विसरत असे.

३. या कवितेत लपाछपी, आंधळी कोशिंबीर व लगोरी या खेळांची नावे आलेली आहेत.

४. आईच्या आवाजाने मुले पळ काढीत असे.

**प्र २.** १. झाडाखाली रमत वेगवेगळे खेळ
तर कधी विसरत जेवणाची वेळ

२. आठवते ती लपाछपी, आंधळी-कोशिंबीर, लगोरी
आठवतात त्या आजोळीच्या चिंचा-बोरी

**प्र ३.** १. वृक्ष  २. मौज  ३. रजनी  ४. खेडे  ५. माता

**प्र ४.** १. सुट्टीची  २. पोळी  ३. बोरी  ४. खेळ

**प्र ५.** १. लगोरी  २. लपाछपी  ३. मजेची  ४. पळती

✦ **हसत-खेळत**

**प्र ६.** विद्यार्थी सुट्टीत केलेली मजा स्वत:च्या शब्दांत थोडक्यात लिहितील.

**प्र ७.** विद्यार्थी आपल्या आवडत्या खेळाचे कोलाज स्वत: बनवतील.

## १५ बाळ गंगाधर टिळक

✦ **पाठ परिचय**

- लोकमान्य टिळकांचा परिचय. नाव, जन्मगाव, जन्मदिनांक यांची ओळख.
- टिळाकांच्या कुटुंबाचा परिचय.
- टिळकांची शाळेतील एक घटना.
- टिळकांच्या हुशारीचा परिचय.
- टिळकांच्या कार्याचा परिचय.

✦ **उद्देश**

- विद्यार्थ्यांना लोकमान्य टिळकांविषयी ओळख करून देणे.
- लोकमान्य टिळकांचा स्वाभिमानीपणा व स्पष्टवक्तशीर-पणाची ओळख करून देणे.
- आपल्या देशासाठी त्यांनी केलेल्या कार्यांविषयी विद्यार्थ्यांना ओळख करून देणे.

✦ **अध्यापन कृती**

- विद्यार्थ्यांशी चर्चा करून त्यांना लोकमान्य टिळकांविषयीची असलेली माहिती जाणून घ्यावी.
- टिळकांचे विचार व त्यांचा व्यवहार किंवा दैनंदिन आचरण याविषयी चर्चा करावी.
- पाठ समजावताना पाठातील कठीण शब्दांचा अर्थ समजावणे.
- पाठ शिकवून झाल्यावर पाठाखालील प्रश्नांवर चर्चा करावी.

✦ **उत्तरे**

**प्र १.** १. लोकमान्य टिळकांचे नाव **बाळ गंगाधर टिळक** होते.

२. लोकमान्य टिळकांच्या आईचे नाव **पार्वतीबाई** व वडिलांचे नाव **श्रीगंगाधरपंत** असे होते.

३. टिळकांनी **केसरी** व **मराठा** ही दोन वर्तमानपत्रे सुरू केली.

४. टिळकांना मंडालेच्या तुरुंगात ६ वर्षांची शिक्षा झाली.

५. मंडालेच्या तुरुंगात टिळकांनी **गीतारहस्य** हा ग्रंथ लिहिला.

**प्र २.** १. केशव २. टरफले ३. सूर्याचे पिल्लू
४. हक्क ५. हुशार

**प्र ३.** १. टिळक २. केसरी व मराठा
३. शिवजयंती व गणेशोत्सव ४. टरफले
५. गीतारहस्य

**प्र ४.** १. सण २. मरण ३. गुरू
४. साल ५. लोक

**प्र ५.** १. मृत्यू २. शिष्य ३. मोठा
४. मठ्ठ ५. अस्पष्ट

**प्र ६.** १. बरोबर २. चूक
३. चूक ४. बरोबर

✦ **हसत-खेळत**

**प्र ७.** विद्यार्थी आपल्या आवडत्या नेत्याचा फोटो चिकटवून बौद्धिक क्षमतेनुसार स्वत: माहिती लिहितील.